# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १०२-२३ दिनांक :- २९/०३/२०२३

## पॅन कार्ड - अधार कार्ड लिंकच्या नावाने होणा-या फसवणूकी संदर्भात दक्षता घेण्याबाबत आयुक्तालयाचे वतीने आव्हान.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नागरिकांना सायबर गुन्हे कक्षाकडून जाहिर आवाहन करण्यात येते की, **"सध्या तुम्ही तुमचे पॅन कार्ड, आधारकार्ड सोबत लिंक/संलग्न केले नसेल तर आताच करा कारण पुढील महिन्यापासून तुमच्याकडून दंड आकारला जावू शकतो अथवा तुमचे पॅन कार्ड रद्द करण्यात येईल. त्यामूळे तुमच्याकडे पॅन आधारसोबत लिंक करण्याकरीता खूप कमी वेळ शिल्लक आहे."** असे सांगून सायबर गुन्हेगार नागरिकांना त्यांचे मोबाईल/व्हॉट्सअॅप/फेसबुक वर मेसेजेसव्दारे लिंक पाठवितात व नागरिकांनी त्यांची वैयक्तीक/बॅंकेची माहिती भरल्यास त्यांची आर्थिक फसवणूक होवू शकते. याकरीता नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.

नागरिकांना अशा प्रकारे **PAN-Aadhaar Link** करावयाचे असल्यास अधिकृत संकेतस्थळाचा www.incometaxindiaefiling.gov.in वापर करावा. अथवा तुम्हाला मोबाईलवरुन पॅन-आधार लिंक करावयाचे असल्यास **UIDPAN** स्पेस १२ अंकी आधारकार्ड स्पेस पॅनकार्ड टाईप करुन 567678 किंवा 561561 वर संदेश पाठवावा. त्यानंतर नोटीफीकेशन आल्यानंतर माहिती भरुन लिंक करु शकता.

### -:घ्यावयाची काळजी :-

१. **PAN-Aadhaar** लिंकसाठी कोणताही फोन अथवा एस.एम.एस. प्राप्त होत नाही.
२. **PAN-Aadhaar** लिंकसाठी मेसेज अथवा फोन आल्यास आपली वैयक्तीक-बॅंकेची माहिती देवू नये.
३. **OTP, Credit Card-Debit Card, CVV** माहिती देवू नये अथवा कोणतेही **Scanner** स्कॅन करु नये.
४. **URL** कडे लक्ष दयावे व कोणतेही स्पॅम मेल ओपन करु नये अशा मेल मध्ये असलेल्या लिंक क्लिक करु नये.
५. ऑनलाईन ॲप/लिंक देणारे ॲप वापरताना आपल्या मोबाईलमधील फोटो, कॉन्टॅक्ट लिस्ट, एसएमएस वा इतर परमिशन्स देवू नये.
६. तुमचे ब्राऊजर्स नियमीत अपडेट करुन घ्या, अँटी व्हायरस इन्स्टॉल करुन घ्या. वेबसाईटवर जाण्यापुर्वी **https** आहे का हे पहा.

तरी नागरिकांनी अशा प्रकारे होणा-या फसवणूकीबाबत सतर्क रहावे. कोणत्याही इसमाची अशा प्रकारे फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

-----oooo----